# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2023 (सोमवार) दुपार

---

## मौजा बाजारगाव बासबन येथील खूनाचे रहस्य उलगडले

### (पोलीस स्टेशन कोंढाळी व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई)

दि. २८/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे— श्री. लिलाधर सदबाजी बोरसरे, ४८ वर्ष, रा. बाजारगाव यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे रीपोर्ट दिला की, कोणीतरी अज्ञात इसमाने दिनांक २८/१२/२०२२ चे १०.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान मौजा बाजारगाव बासबन येथे भारत आनंदराव वरवाडे, वय ३७ वर्षद्व रा. बाजारगाव यास अज्ञात कारणावरून कशानेतरी गंभीररीत्या जखमी करून जिवानीशी ठार केले आहे. अशी रीपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अप क्र. ५६८/२०२२ कलम ३०२ भादविचा गुन्हा नोंद होता.

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद यांचे आदेशान्वये पोलीस स्टेशन कोंढाळी व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. यातील मृतक हा आरोपीचा जावई असुन तो दारू पिण्याच्या सवयीचा होता तो पत्नीला व सासुला मारहाण करीत होता. लोकांकडुन उधारीचे पैसे घेवुन घरच्यांना देण्यास भाग पाडत होता. मरणाच्या आदल्या दिवशी मृतकाने सासूला मारहाण केली होती. या गुन्हयाबाबत संशयित आरोपी मृतक जावयाच्या जाचाला कंटाळुन त्याचा खुन केला. असे आरोपीने कबुल केले.

सदर गुन्हयात अटक आरोपी नामे **१) श्रीमती अल्का ज्ञानेश्वर बोरसेरे, वय ५८ वर्ष, रा. बाजारगाव** यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याने त्यांना ताब्यात घेतले. सर्व आरोपीनी गुन्हयाची कबुली दिलेली आहे. तपास पोस्टे कोंढाळी चे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे हे करीत आहेत.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजु कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, अनिल राऊत, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, सहायक फौजदार चंद्रशेखर गडेकर, पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोलीस उपनिरीक्षक मिना बारंगे, सहायक फौजदार जयसिंग पवार, बाबुलाल रोठोड, सुनिल बन्सोड, पोलीस हवालदार किशोर लोही, दारासिंग राठोड, पोलीस नायक सुनिल ठोंबरे, पोलीस शिपाई होमेश्वर वाईलकर, गौरव मोकळे, इमरान सय्यद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर